# GREEN HILLS GROUP

Public Charitable Trust Reg No E-4044.
1 Vallabh Soceity , Senapati Bapat Road , Pune 411016

---

मा. श्री. पतंगराव कदम साहेब  दिनांक १ मार्च,२०१४
वन मंत्री
महाराष्ट्र शासन,
पुंणे.

महोदय,

ग्रीन हिल्स ग्रुप आणि इतर पर्यावरण प्रेमी बांभुर्डा वनक्षेत्रातील ARAI कंपनी पाठीमागील टेकडी तसेच हनुमान टेकडी ,चतुश्रृंगी टेकडी आणि कोथरुड येथील वनदेवी मंदिराच्या पठीमागील टेकडी येथे वृक्षारोपण आणि वृक्ष-संवर्धन करत आहे. ह्यासाठी वनखाते, पुणे महापालिका, महाविद्यालयातील विद्यार्थी आणि पुण्यातील नावाजलेल्या कंपन्यातील कर्मचारी वेळोवेळी मदत करत आहेत.
हे कार्य असेच पुढे चालु ठेउन पुण्याजवळील वनक्षेत्रात येणा-या टेकड्या हिरव्यागार करण्यासाठी ग्रीन हिल्सचे कार्यकर्ते वनखात्याला मदत करण्यास उत्सुक आहेत.ह्या कार्यात येणारे अडथळे पार करुन यश मिळविण्यासाठी वनखात्याने खालील गोष्टींची अमलबजावणी करावी अशी आमच्या ग्रुपची कळकळीची विनंती आहे. तरी आपण ह्या निवेदनाचा विचार करावा ही विनंती.

१. वनक्षेत्रात आग लागु नये आणि लागल्यास त्यापासुन रोपांना कमीतकमी नुकसान व्हावे ह्यासाठी वनखात्याने जाणीवपुर्वक प्रयत्न करावेत.
२. सीमाभिंती मधे कुठेही जागा न ठेवणे. ह्यामूळे वनहद्दीतुन होणारी वृक्षतोड थांबेल आणि डुक्कर, शेळ्या, म्हशी ह्यांच्यापासून रोपांचे संरक्षण होइल.
३. वनखात्याच्या नर्सरीमधे वनात सापडणा-या झाडांचीच रोपे तयार करणे. ह्या कामात ग्रीन हिल्सचे कार्यकर्ते वनातील झाडांच्या बिया गोळा करुन वनखात्याला देण्यास आणि नर्सरीच्या कामात आवश्यक मदत करण्यास उत्सुक आहेत.
४. वनखात्याने शहरातील crush केलेल्या पालापाचोळाचा उपयोग वनातील पडीक जमिनीतील मातीची पोत वाढवण्यासाठी करणे. महापालीकेने बालचित्रवाणीजवळील वनखात्याच्या जमीनीवर crusher बसविला आहे. तो चालु करण्यामधील आडथळे दुर करणे.

५. शहरांजवळील वनातील जमीनींचा वापर फक्त वन्यप्राणी आणि पक्षी ह्यांच्यासाठीच व्हावा. वनखात्याने Commercial interest साठी कुणाला परवानगी देउ नये.

६. वनखात्याने शहराच्या आसपास असणा-या वनजमीनींचे नकाशे तसेच १९२० पासुन जागेच्या मालकीमधील झालेले बदल वनखात्याच्या प्रत्येक कार्यालयात आणि वनखात्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

७. वनखात्याच्या जमीनींवर वनखात्याच्या मालकीचे फलक लावावे.

आपला विश्वासू,

संजय आठवले आणि इतर कार्यकर्ते.
ग्रीन हिल्स ग्रुप, पुंणे.